REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# वाङ्मयातील व्यक्तिरेखांचे मानवकेंद्री व मौलिक योगदान


प्रा.डॉ.प्रदीप रावूत
गिलानी महाविद्यालय, घाटंजी जि. यवतमाळ.

सारांश—

''व्यक्तिरेखांची मानवकेंद्रितता'' म्हणजेच व्यक्तिरेखांचे योगदान. अर्थात, वाङ्मयकृतीतून आपले विचार, वर्तन, कृती, यातून व्यक्तिरेखा ज्या बाबी मानवाला देऊ पाहतात, त्या बाबी देण्याच्या व्यक्तिरेखांच्या स्वाभाविक वा जाणीवपूर्वक प्रयत्नाला व्यक्तिरेखांचे योगदान असे म्हणता येईल. व्यक्तिरेखा जेव्हा कळत—नकळतपणे मानवी हितास पूरक ठरणारी कृती वा वर्तन करते तेव्हा तिचे हे योगदान 'जीवनदायी' स्वरूपाचे तर ती जेव्हा एखादा मानवीय विचार प्रकट करते, तेव्हा तो तिचा विचार व्यक्तिरेखेचे 'विचारदायी' योगदान ठरते. ..... अर्थात,'व्यक्तिरेखांची मानवकेंद्रितता' या शब्दप्रयोगाचा अर्थ फार व्यापक आहे.

'कादंबरीच्या विस्तीर्ण आविष्कार पटात अनेक प्रकारच्या व्यक्ती—प्रसंग, चित्रणाला, स्थलकालादी वातावरण निर्मितीला, चिंतन—मनन—भाष्ये यांच्या प्रकटणाला मोठाच वाव असतो.'[१] त्यामुळे कादंबरीतील व्यक्तिरेखांच्या माध्यमातून मानवी जीवनास उपकारक ठरणारे महत्त्वपूर्ण असे विचार व इतर बाबी कळत नकळत व्यक्त केल्या जातात. खरे म्हणजे, 'जीवनाचा अर्थ लावणे हीच साहित्यकृतीमध्ये महत्त्वाची गोष्ट असते.'२ व्यक्तिरेखा व्यक्तीला प्राप्त परिस्थितीशी समायोजन साधून, आलेल्या संकटांना तोंड देण्याचा मार्ग दाखवितात. व्यक्तिरेखांचे हे मार्गदर्शन मानवासाठी 'जीवनदायी' योगदानच ठरते. हरिभाऊ आपटे, वि.स.खांडेकर, वा.म.जोशी, दांडेकर, वरेरकर व माडखोलकरांसह अनेक जुन्या नव्या मराठी कादंबरीकारांनी, मानवी जीवनाला एक अर्थ प्राप्त करून देण्याची साहित्याच्या माध्यमातून अखंड धडपड केली. त्यांनी निर्माण केलेले कादंबरीवाङ्मय त्यांच्या या धडपडीची साक्ष तर देतेच पण त्यांच्या कादंबऱ्यातील व्यक्तिरेखांनी सारे समाजमन प्रभावित करून टाकल्याने, 'कादंबरीला' जीवन घडविणारे एक साधन, असा दर्जा प्राप्त झाला आहे.

खांडेकरांच्या व्यक्तिरेखांचे अध्ययन करूनच चंद्रकांत बांदिवडेकरांसारख्या समीक्षकाने 'सौंदर्याच्या माध्यमातून मनुष्याच्या मनावर सद्भावनांचे संस्कार करणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे.'[३] असा निष्कर्ष काढला असेल. 'कादंबऱ्यांच्या माध्यमातून जीवनाची सेवा करण्याचा उद्देश त्यांनी आपल्यापुढे ठेवला होता.'[४] सदा कऱ्हाडेही सांगतात, 'खांडेकर मुलतः संस्कारवादी होते. मानवता हीच ललित लेखकाची जात आहे आणि माणूसकी हा त्याचा धर्म आहे अशी त्यांची श्रद्धा होती.'[५] एकंदरीत, 'साहित्यातील जीवनवादाविषयी खांडेकरांची भूमिका ठाम होती.'[६] त्यामुळे व्यक्तिरेखांच्या माध्यमातून त्यांनी जीवनदायी असा विचार मांडल्याने, त्यांच्या व्यक्तिरेखांनी 'जीवनदायी' योगदान दिले असे म्हणता येईल. कानडजे म्हणतात, 'कादंबरीतील प्रत्येक पात्रांची विशिष्ट अशी भूमिका आहे.'[७] अर्थात, पात्रांची भूमिका म्हणजे एकप्रकारची वाङमयाचीच भूमिका ठरते.



वाङ्मयाची जशी भूमिका असेल त्यावरून त्याची साधारणत: रूपवादी, रीतिवादी, कलावादी, आशयवादी, जीवनवादी अशी विभागणी करण्यात येते. या.वा.वडस्कर तर स्पष्टच सांगतात, 'मार्क्सवादी, आधुनिक ग्रामीण व दलित साहित्य हे जीवनवादी व आशयवादी ठरते'[८] जनांचे, सामान्यांचे ठरणाऱ्या 'जनसाहित्याबद्दल' ते सांगतात, 'जनसाहित्याची भूमिका समग्र परिवर्तनाची आहे. ती केवळ आर्थिक समतेचा वा केवळ सामाजिक समतेचा पुरस्कार करीत नसून संपूर्ण समतेचा पुरस्कार करते.'[९] यातून हेच स्पष्ट होते की, व्यक्तिरेखा ह्या परिवर्तन करण्याची, समता निर्मितीची भूमिका बजावू शकतात. 'तल्हारांची 'माणूस' नेमाड्यांची 'कोसला' श्री.ना.पेंडशांची 'रथचक्र' यासारख्या अमर झालेल्या श्रेष्ठ कलाकृती प्रस्थापित विरोधी आहे.'[१०] त्यातील नायक जवळपास सर्वच प्रकारच्या विषमतेमुळे भरडल्याने प्रचलित व्यवस्थेच्या विरोधात ते आपला आक्रोश नोंदवत असतात. हेतू हाच की, त्यांना गुलामीचे परंपरागत जीवन जगायला लावणारे कोण? हे समाजाला व त्या विस्थापितांना कळावे.

कादंबरी या वाङ्मयप्रकारात व्यक्तिरेखांच्या विचार प्रकटीकरणास विशेष वाव आहे. त्यामुळे वैचारिकतेतून निर्माण होणारे 'विविध सामाजिक संदर्भ साहित्यप्रक्रियेत झिरपत असतात.'[११] भालचंद्र नेमाडे तर सांगतात, 'समाज जीवनाची नोंद करणारा वाङ्मयप्रकार म्हणून जन्माला आलेल्या कादंबरीत सामाजिक वास्तव हेच द्रव्य असते.'[१२] म्हणूनच ....'संस्कृतीच्या निर्मितीतही साहित्याचा सहभाग असतो.'[१३] 'साहित्य व संस्कृती यांचा आंतरिक, सचेतन व अतूट संबंध असतो.'[१४] असे गौरोद्गार काढले जातात. वा. म. जोशींच्या 'रागिणी'बद्दल काढलेले कुरूंदकरांचे उद्गार, 'रागिणीतील' एकूण व्यक्तिरेखांच्या 'विचारदायी' योगदानाचेच सूचन करते. ते सांगतात, 'या कादंबरीत कारण असो वा नसो निरनिराळी पात्रे एकत्र जमतात आणि कोठल्यातरी तात्त्विक विषयावर चर्चा करू लागतात.'[१५] अर्थातच ही तात्त्विक चर्चा का? व कुणासाठी? असे प्रश्न इथे उपस्थित होतात. वाचकांनाच एक विचार देण्यासाठी ही तत्त्वचर्चा केली जाते हे अगदी उघड आहे.

केतकरांच्या व्यक्तिरेखांबद्दल कुरूंदकर म्हणतात, 'या व्यक्तीचे सगळे चिंतन आणि विश्लेषण वर्तमाननिष्ठ आहे.'[१६] याचा अर्थ हाच की, तत्कालीन काळात जे विचार समाजाला देणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते, ते विचार त्यांनी आपल्या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न केला आहे. केतकरांनी मनोविश्लेषण करून आपल्या मनोविश्लेषणात्मक कादंबऱ्यात रेखाटलेल्या व्यक्तिरेखांबद्दल कुरूंदकर पुढे सांगतात, 'मनोविश्लेषण करीत असताना ते व्यक्तींच्याकडे व्यक्ती म्हणून पाहातच नाहीत, समाजाचा घटक म्हणून पाहतात.'[१७] ....याचाच अर्थ केतकरांनी अशी पात्रे रेखाटलेली आहेत की जी समाजमनाचा विचार करू शकतील. व्यक्तिरेखांचे योगदान स्पष्ट व्हावे म्हणून व्यक्तिरेखांचे कादंबरीतील प्रत्यक्ष विचार पाहणे उचित ठरेल. 'पानकळा'तील आनंदराव म्हणतो, 'मनुष्याचं मन बदलल्याशिवाय खरी गुन्हेगारी जगातून नाहीशी होणार नाही.'[१८] 'अपुरा डाव'मधील सीताबाई म्हणते, 'कधी कधी माणसं पशूसारखी वागतात, राक्षसापेक्षाही राक्षसासारखी कृत्ये करतात, मानवजातीला काळीमा आणणाऱ्या किती तरी गोष्टी ही माणसंच करतात.'[१९]

कादंबरीतील व्यक्तिरेखांच्या योगदानाची पूर्वपरंपरा 'यमुनापर्यटन'पासून पाहावी लागेल. या कादंबरीतील सर्वच पात्रांनी मानवासाठी जीवनविषयक एक नव्हे तर अनेक बाबींचा 'बोध' करून दिला आहे. हा बोध लक्षात आल्यानेच नरहर कुरूंदकर म्हणतात, 'मराठी कादंबरीतील बोधवादाचा आरंभ म्हणून 'यमुनापर्यटन'ला महत्त्व आहे.'[२०] तर श्रीकांत तिडके सांगतात, ''यमुनापर्यटन'ने कादंबरी ही समाजचिंतनाचे व कृतीप्रधान आविष्काराचे साधन आहे.'[२१] भालचंद्र नेमाडेंची मात्र नव्या कादंबरीतील व्यक्तिरेखांकडून फार वेगळ्या योगदानाची अपेक्षा असल्याने ते म्हणतात, ''यमुनापर्यटन'नंतरच्या बहुसंख्य कादंबरीकारांनी स्थल आणि काल यांच्याशी जवळचे नाते प्रस्थापित करून मराठी लोकांच्या आशाआकांक्षा, समस्या, विचार, भावना आणि एकूण सामाजिक वास्तव जेवढ्या प्रमाणात विश्वासार्ह रूपाने प्रतिबिंबित करायला पाहिजे, तेवढे दिसत नाही.'[२२] या. वा. वडस्करही 'यमुनापर्यटन'बद्दल म्हणतात, 'या कादंबरीमधील प्रेरणा अस्सल परिवर्तनवादी, प्रस्थापितविरोधी व जनवादी आहे.'[२३] म्हणजेच या

कादंबरीतील व्यक्तिरेखांनी प्रस्थापितांविरोधी अशी परिवर्तनवादी भूमिका घेऊन जणू नव्या युगास आरंभच केला. सदा कऱ्हाडेसारख्या अभ्यासकाने एका संपूर्ण पिढीतीलच प्रतिभावंतांच्या भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्या सांगतात, 'वा. म. जोशी, न. चि. केळकर, श्री. कृ. कोल्हटकर, हरिभाऊ आपटे या विचारवंतांची पिढी ही एका अर्थी समन्वयवादी होती. जीवनदर्शन, उद्बोधन ही कार्ये साहित्याने करायची असते, अशी भूमिका या पिढीची होती.'[२४] वरेरकर व वि. वा.हडप यांच्या समग्र कादंबऱ्यांचे अभ्यासक अ.ना.देशपांडे सांगतात, 'शहरातील मजुरांची आणि ग्रामीण जनतेची सुख दु:ख जाणून घेण्याविषयी वरेरकरांनी आस्था दाखविली.'[२५] ते पुढे सांगतात, 'ठाणे जिल्ह्यातील वारल्यांचा सावकाराच्या हातून होत असलेला अमानुष छळ पाहून हडपांची लेखणी अस्वस्थ व संतप्त झाली.'[२६] .... सामान्यांच्या छळाची साहित्यातून कशी दखल घेतली जाते हेच यावरून सूचित होते. वा.म.जोश्यांच्या 'सुशीलेचा देव' या कादंबरीतील सुशीलेबद्दल बांदिवडेकर सांगतात, 'सुशीला एकाच वेळी पुरोगामी स्त्रीची प्रतिनिधी म्हणूनही येते आणि व्यक्ती म्हणूनही उभी राहते.'[२७] 'कोसला'तील पांडुरंग सांगवीकर अनेक विद्यार्थ्यांना आपला प्रतिनिधी वाटू शकतो. म्हणूनच तिचे लेखक नेमाडे सांगतात, 'पांडुरंग सांगवीकर म्हणजे त्याच्यामागे सबंध विद्यार्थी बोलतात की काय असं दिसेल.' [२८] नरहर कुरूंदकरही सांगतात, 'कोसला ही आजच्या तरूण विद्यार्थ्यांना मनाच्या चिंतनाचा निरर्थकपणा सांगणारी एक सफल कलाकृती आहे.'[२९] सांवतही सांगतात, 'पांडुरंग हा लेखकाचा प्रोटॅगॉनिस्ट कादंबरीतून व्यक्त होणाऱ्या लेखकाच्या नैतिकतेचा प्रतिनिधी आहे.'[३०] 'मेड इन इंडिया'बद्दल चर्चा करताना भास्कर शेळके त्यातील नायकाबद्दल म्हणतात, 'सुशिक्षित बेकारांचा प्रतिनिधी म्हणून पंजाबराव गरसोळीकर जिवंत केला आहे.'[३१] 'गणगोत'मधील अंजू शेळकेंना 'पती परमेश्वर मानणाऱ्या नवविवाहितांची प्रतिनिधीच वाटते.'[३२] 'विषवृक्षाच्या मुळ्या'मधील विश्वनाथ हा कादंबरीच्या केंद्रस्थानी असला तरी सहकारातील भ्रष्टाचारामुळे शोषण होणारा सामान्य माणूसच येथे केंद्रस्थानी असल्याचे जाणवते.'[३३] याचाच अर्थ, हा विश्वनाथ भ्रष्टाचाराला बळी पडलेल्या व्यक्तींचा प्रतिनिधी ठरू शकतो. 'धग'मधील कौतिकबद्दल कोतापल्ले सांगतात, 'ग्रामीण भागातील दारिद्र्याशी धैर्याने दोन हात करणाऱ्या असंख्य स्त्रियांचे प्रतिनिधित्व कौतिक करते.'[३४] या अशा अनेक कादंबऱ्या, त्यातील चित्रण व नायक हे प्रातिनिधिक व प्रतिनिधी ठरतात.

व्यक्तिरेखांच्या मानवाप्रती असलेल्या अमूल्य योगदानाचा सुगावा, समीक्षक व अभ्यासकांनी व्यक्त केलेल्या मतांमधून लागू शकतो. चंद्रकांत बांदिवडेकर, नरहर कुरूंदकर, अविनाश सप्रे, भालचंद्र नेमाडे, अ. ना. देशपांडे, अरविंद कुळकर्णी, श्री. के. क्षीरसागर, भास्कर शेळके, रवींद्र ठाकूर, आनंद यादव आदी समीक्षकांच्या व्यक्तिरेखांसंदर्भातील विचारांचा केवळ एक संदर्भ म्हणून व्यक्तिरेखांच्या योगदानाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. चंद्रकांत बांदिवडेकर 'रथचक्र'मधील व्यक्तिरेखेबद्दल म्हणतात, 'पेंडशांनी नियतीचा व माणसाचा संघर्ष एका सामान्य स्त्रीच्या रूपानं प्रस्तुत केला आहे.'[३५] अर्थातच ही स्त्री आहे, कृष्णाताई. तिने केलेला जीवनासोबतचा संघर्ष व या संघर्षात मिळविलेला विजय मानवाला संघर्षाचे तत्त्वज्ञान तर शिकवितेच पण समस्त स्त्री—जातीसाठी कृष्णाताई म्हणजे एक संघर्षाचे प्रतीक बनते. केतकरांच्या कादंबऱ्यातील चित्रणाबद्दल ते स्पष्ट करतात की, 'दंभ, स्वार्थ, विषयवासना यांनीच मानवी व्यवहार कसा नियमित झाला आहे, याचे विश्लेषण व विदारक चित्रण केतकर करतात.'[३६]

नरहर कुरूंदकर श्री. व्यं. केतकरांच्या व्यक्तिरेखांबद्दल म्हणतात, 'केतकरांच्या कादंबरीतील पात्रे केतकरांच्या भाषेत बोलतात.'[३७] याचाच अर्थ केतकरांची ही पात्रे त्यांचा सामाजिक विचार प्रसृत करतात. त्यामुळेच त्यांची पात्रे अतिशय धीटपणाचा व परखड विचार व्यक्त करतांना आढळून येते. केतकरांच्या 'गोंडवणातील प्रियवंदा'मधील प्रियवंदेचा विचार इथे उद्धृत करावा असाच आहे. ती म्हणते, 'लग्न न करताच स्त्रियांनी प्रजोत्पत्ति केली तर त्यास काय हरकत आहे?'[३८] ...पण तिने असा प्रश्न का उपस्थित करावा? तिच्या या अशा परखड प्रश्नामुळेच या प्रश्नाचे उत्तर शोधण्याची गरज वाटते. कुरूंदकर हरिभाऊंच्या कादंबऱ्यांबद्दल म्हणतात, 'मराठीत प्रथमच जिवंत माणसांच्या

जीवनाविषयी प्रामाणिक कुतूहल असणारी कादंबरी त्यांनी लिहिली हे मान्य करावे लागेल.'[३९] जिवंत माणसांच्या जीवनाविषयी हरिभाऊंनी जे काही सांगितले ते आपल्या व्यक्तिरेखांच्या माध्यमातूनच! व्यक्तिरेखांचे आदर्शत्व माणसांना स्वीकारण्यासारखे असल्यामुळेच माणसांना त्यांच्या कादंबऱ्यांचे आकर्षण वाटू लागले.

खांडेकर, माडखोलकर, केतकर, वरेरकर यांच्या अशाच काही स्त्री व्यक्तिरेखांबद्दल अ. ना.देशपांडे सांगतात, 'खांडेकरांची वत्सला, माडखोलकरांची अनू, केतकरांची कालिंदी, वरेरकरांची मथू यांच्या चरित्रावरून, पुरूषवर्गाच्या बेजबाबदार वृत्तीची साक्ष पटून स्त्रियांच्या कुचंबनेची स्पष्ट जाणीव होते. ही कुचंबना कमी करण्याच्या दृष्टीने प्रेमविवाहाची प्रथा पुष्कळच उपकारक ठरणारी आहे असा जवळपास या सर्वच कादंबरीकारांचा विश्वास आहे व या कादंबरीकारांनी आपल्या कथावस्तूतून हे सूचित केले आहे.'[४०] यातून हेच लक्षात येते की, वत्सला, अनू, कालिंदी, मथू ह्या अतिशय परखड अशा स्त्री व्यक्तिरेखा होत्या. अन्याय दूर करणे हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते. अविनाश सप्रे या कादंबरी समीक्षकाने व्यक्तिरेखांबद्दल व्यक्त केलेल्या विचारांतूनही व्यक्तिरेखांचे योगदान लक्षात येते. 'हद्दपार'मधील राजे मास्तरबद्दल ते सांगतात, 'सचोटी, पिळदारपणा, न्यायप्रियता लाभलेल्या मास्तलरांनी स्वत्व सोडले नाही आणि आपल्या वर्तनाचा विलक्षण ठसा उमटवला.'[४१] 'पवनाकाठचा धोंडी'मध्ये चित्रित केलेल्या धोंडीबद्दल ते सांगतात, 'वास्तवाशी एकाकीपणे जिद्दीने झुंज घेणारा धोंडी चित्रित केला.'[४२] 'पडघवलीतील' अंबूबद्दल ते म्हणतात, 'अंबूच्या वाट्याला अनंत दु:खे येतात पण ती स्वत्व सोडत नाही.'[४३] 'शितू'मधील शितू त्यांना स्वत्वसंपन्न वाटते.[४४] 'भावीण'मधील शेवंताही त्यांना सात्त्विक वृत्तीची वाटते.[४५] 'धग'मधील कौतिक तर त्यांना एक करारी सुन वाटते.[४६] 'कोंडुरा'मधील तात्या त्यांना लोकविलक्षण वाटतो.[४७] 'बळी'तील आबांबद्दल ते सांगतात, 'आपल्या समाजाचे अध:पतन तो उघड्या डोळ्याने बघतो, पण त्यापासून पळून जावे असे त्याला वाटत नाही. उलट या समाजाला या गाळातून वर काढले पाहिजे असे त्याला ठामपणे वाटू लागते.'[४८] 'बखर एका राजाची'मधील रघुविरसिंहाच्या जीवनाबद्दल ते सांगतात, 'हा राजा सुसंस्कृत आहे, समंजस आहे, साहित्याबद्दल त्याला अतीव प्रेम आहे.'[४९] एकंदरीत त्यांच्या नजरेने न्यायप्रिय, जिद्दी, स्वत्वसंपन्न, सात्त्विक, करारी, लोकविलक्षण, समंजस व आबांसारखी संवेदनशील अशी माणसे त्यांना कादंबरीत दिसली आहे. अर्थात ही अशी अनुकरणीय माणसे वाचकांचा जीवनविषयक एक दृष्टिकोन तयार करतात. म्हणूनच मानवाप्रती ते आपले मौलिक असे जीवनदायी व विचारदायी योगदान देत असतात असे म्हणता येईल. या अशा व्यक्तिरेखांपासून मानवाला प्रेरणा न मिळाली तरच नवल!

## निष्कर्ष—

व्यक्तिरेखा ह्या समाजातील भिन्न भिन्न स्तरातील व्यक्तींच्या जणू प्रतिनिधी बनून वाडमयात वावरत असतात. वाङ्मयकृतीतून आपले विचार, वर्तन, कृती, यातून व्यक्तिरेखा ज्या बाबी मानवाला देऊ पाहतात, त्या बाबी देण्याच्या व्यक्तिरेखांच्या स्वाभाविक वा जाणीवपूर्वक प्रयत्नाला व्यक्तिरेखांचे जीवनदायी व विचारदायी ठरणारे मौलिक योगदान असे म्हणता येईल.

## संदर्भ टीप—


१. खोले विलास—(संपा.) गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी, लोकवाङ्मयगृह, मुंबई. आ. पहिली २००३, पृ. २१२
२. कोतापल्ले नागनाथ—साहित्याचा अवकाश, प्रतिमा प्रकाशन, पुणे. आ. पहिली २००३, पृ. ३३
३. बांदिवडेकर चंद्रकांत—मराठी कादंबरी: चिंतन आणि समीक्षा, मेहता पब्लिशिंग, पुणे. आ.दुसरी १९९६, पृ .५३
४. कित्ता— पृ. ५४
५. एस. एस. भोसले—(संपा.) साहित्यिक खांडेकर, अजब पुस्तकालय, कोल्हापूर. आ. पहिली १९८०, पृ. ७३

६. कित्ता– पृ. ७३
७. कानडजे एस. एम.–आनंद यादव साहित्य आणि जीवन, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. आ. पहिली १९९५, पृ. ७१
८. पाटील मृणालिनी–(संपा.) समकालीन साहित्यः प्रवृत्ती आणि प्रवाह, विजय प्रकाशन, नागपूर. आ. पहिली १९८५,पृ. ६१
९. कित्ता– पृ. ६७ १०. कित्ता– पृ. ६८
११.नेमाडे भालचंद्र–टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद. आ. दुसरी २००१, पृ. १०४
१२.कित्ता– पृ. २१८
१३.तिडके श्रीकांत–समकालीन साहित्यः जाणिवा आणि भाष्य, सुधा मुनघाटे, नागपूर. आ. पहिली २०००, पृ. १८
१४.कित्ता– पृ. १८
१५.कुरूंदकर नरहर–धार आणि काठ, देशमुख आणि कंपनी, पुणे. आ. तिसरी १९९३, पृ. ८३
१६.कित्ता– पृ. १०१ १७. कित्ता– पृ. १०३
१८.दिघे र.वा. –पाणकळा, ठोकळ प्रकाशन, पुणे. आ. पाचवी १९७५, पृ. २१८
१९.कवठेकर द.र.– अपुरा डाव, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई. आ.चौथी १९७६, पृ. १०९
२०.कुरूंदकर नरहर–धार आणि काठ, देशमुख आणि कंपनी, पुणे. आ. तिसरी १९९३, पृ. २०
२१.तिडके श्रीकांत–समकालीन साहित्यः जाणिवा आणि भाष्य, सुधा मुनघाटे, नागपूर. आ. पहिली २०००, पृ. १०
२२.नेमाडे भालचंद्र–टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद. आ. दुसरी २००१, पृ. २९८
२३.पाटील मृणालिनी–(संपा.) समकालीन साहित्यः प्रवृत्ती आणि प्रवाह, विजय प्रकाशन, नागपूर. आ. पहिली १९८५,पृ. ६३
२४.एस. एस. भोसले–(संपा.) साहित्यिक खांडेकर, अजब पुस्तकालय, कोल्हापूर. आ. पहिली १९८०, पृ. ९१
२५.देशपांडे अ.ना.–आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २, व्हीनस प्रकाशन, पुणे. आ. पहिली १९५८,पुनर्मुद्रण१९७०,पृ. १२०
२६.कित्ता– पृ. १२०
२७.कोतापल्ले नागनाथ–साहित्याचा अवकाश, प्रतिमा प्रकाशन, पुणे. आ. पहिली २००३, पृ. १६२
२८.नेमाडे भालचंद्र–टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद. आ. दुसरी २००१, पृ. ३७६
२९.कुरूंदकर नरहर–धार आणि काठ, देशमुख आणि कंपनी, पुणे. आ. तिसरी १९९३, पृ. २६२
३०.सावंत वासुदेव–उदाहरणार्थ कोसला, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर. आ. पहिली १९९९, पृ. १२१
३१.शेळके भास्कर–मराठी कादंबरीतील प्रादेशिकता, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे. आ. दुसरी २००४, पृ. १०४
३२.कित्ता– पृ. १०४ ३३. कित्ता– पृ. १०४
३४.कोतापल्ले नागनाथ–साहित्याचा अवकाश, प्रतिमा प्रकाशन, पुणे. आ. पहिली २००३, पृ. २०८
३५.बांदिवडेकर चंद्रकांत–मराठी कादंबरीः चिंतन आणि समीक्षा, मेहता पब्लिशिंग, पुणे. आ.दुसरी १९९६, पृ . ९२
३६.बांदिवडेकर चंद्रकांत–मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. आ.पहिली १९८९, पृ १६६
३७.कुरूंदकर नरहर–धार आणि काठ, देशमुख आणि कंपनी, पुणे. आ. तिसरी १९९३, पृ. १०७
३८.देशपांडे अ.ना.–आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २, व्हीनस प्रकाशन, पुणे. आ. पहिली १९५८,पुनर्मुद्रण१९७०,पृ. ११७
३९. कुरूंदकर नरहर–धार आणि काठ, देशमुख आणि कंपनी, पुणे. आ. तिसरी १९९३, पृ. ५१
४०.देशपांडे अ.ना.–आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २, व्हीनस प्रकाशन, पुणे. आ. पहिली १९५८,पुनर्मुद्रण१९७०,पृ. ११८
४१.कुळकर्णी अनंत अनिरूद्ध–(संपा.) प्रदक्षिणा खंड २, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. आ.दुसरी १९९८. पृ. १७४

४२.कित्ता— पृ. १७९
४३.कित्ता— पृ. १७९
४४.कित्ता— पृ. १७९
४५.कित्ता— पृ. १८२
४६.कित्ता— पृ. १८३
४७.कित्ता— पृ. १८६
४८.कित्ता— पृ. २२९
४९.कित्ता— पृ. २३५